# संचालनालय

## लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

नवीन शासकीय कुटीर क्रमांक १५ व १६

फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - ४०० ०२१.

क्र. व्हर्च्युअल ट्रेझरी/२०१३/न.क्र.११९/४०५ दिनांक:- 29 JUN 2013

**विषय:- सर्व कोषागारात मुद्रांक विक्रेत्यांकडुन (Stamp vendors) "ग्रास" प्रणाली मार्फत ई-पेमेंट स्विकारणेबाबत.**

पहा:- संचालनालयाचे आदेश क्र. संलेवको/व्ह.ट्रे-२०११/मुविआ/न.क्र.११९/२७१, दि.१३.१०.२०११.

**-: परिपत्रक :-**

उपरोक्त विषयावरील संचालनालयाचे संदर्भाकिंत कार्यालयीन आदेश कृपया पहावेत.

माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन शासनाकडे जमा होणारा महसूल व महसूलेतर जमा रकमा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने शासनाच्या तिजोरीत जमा व्हाव्यात, याकरिता "शासकीय जमा लेखांकन पध्दती" (Government Receipt Accounting System-GRAS) या प्रणालीची निर्मिती करण्यात आलेली आहे. याकरिता बँकिंग क्षेत्रात होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स सुविधांचा वापर करुन जनतेला विनासायास महाराष्ट्र शासनाचा कर व अन्य भरणा करता यावा या उद्देशाने इंटरनेट बँकिंग सुविधेचा वापर व बँकांच्या ई-पेमेंट गेटवे पध्दतीचा उपयोग या प्रणालीत करण्यात आला आहे.

जिल्हा कोषागार कार्यालयात मुद्रांक विक्रीबाबत मुद्रांक विक्रेत्याकडून (Stamp vendors) रोख रक्कम / धनाकर्ष न स्विकारता यापुढे **"ग्रास"** प्रणालीमार्फतच ई-पेमेंट द्वारे स्विकारण्याबाबत संदर्भाकिंत आदेशान्वये सूचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, कोषागार कार्यालय ठाणे, रायगड, वर्धा, भंडारा,जळगांव, कोल्हापूर, पुणे वगळता इतर कोषागार कार्यालयांनी अद्याप मुद्रांक विक्रेत्याकडून **"ग्रास"** प्रणालीमार्फत ई-पेमेंट स्विकारण्याची कार्यपद्धती अवलंबिलेली नाही.

कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई यांचेकडून सर्व जिल्हा कोषागार अधिकारी यांना "ग्रास" प्रणालीचे लॉगईन आयडी व पासवर्ड (for ATO Stamps) यापूर्वीच देण्यात आलेले आहेत.

जिल्हा कोषागारातर्फे मुद्रांक विक्रीबाबत मुद्रांक विक्रेत्यांकडून (Stamp vendors) रोख रक्कम / धनाकर्ष न स्विकारता **"ग्रास"** प्रणाली मार्फतच इलेक्ट्रॉनिक पध्दतीनेच स्विकारण्यासाठीची प्रक्रिया दिनांक ०१ जुलै, २०१३ अनिवार्य राहील. जिल्हा कोषागार अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात सदर कार्यपद्धतीची पूर्णत: अंमलबजावणी करावी. तसेच त्यांच्या अधिपत्याखालील उपकोषागार कार्यालयात सदर कार्यपद्धतीची अंमलबजावणी टप्प्या-टप्प्याने पूर्ण करावी. **"ग्रास"** प्रणालीद्वारे प्राप्त होणाऱ्या मुद्रांक विभागाच्या रकमांचे लेखांकन कसे करण्यात यावे, याबाबतच्या सूचना संचालनालयाचे परिपत्रक दि.२६.०७.२०१२ अन्वये यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत.

याबाबत काही अडचणी असल्यास कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयाशी संपर्क साधावा.

संपर्क:- कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई.

दुरध्वनी क्र. :- ०२२-२२०४०५७०/६८/६४

ई-मेल :- vto@mahakosh.in

फॅक्स :- ०२२-२२०४०५७०

संचालक

लेखा व कोषागारे, मुंबई.

प्रत :-

१. मा. सचिव (ले.व को.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे माहितीस्तव सादर.
३. सहसंचालक, ले.व, को.,कोकण /नाशिक /पुणे / अमरावती /नागपूर /औरंगाबाद विभाग.
४. सर्व कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिकारी.
५. लेखा अधिकारी, कोषागार संकीर्ण शाखा, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई.
६. कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई.

C:\Documents and Settings\Ravidas.Gavali\Desktop\F.No.119.doc